## जागतिक महिला दिन कार्यक्रम

## पोस्टर प्रदर्शनीचे व कार्यक्रमाचे आयोजन: 8 मार्च 2022






दिनांक ८ मार्च २०२२ रोजी समाजकार्य विभागाच्यावतीने जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्धाटन महिला विकास संथेचे सचिव डॉ. अभिजित वेरुळकर व प्राचार्य डॉ. आशिष ससणकर यांनी केले. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील सर्व प्राध्यापक मंडळी व विध्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्त्री-पुरुष समानता, मुलींचे शिक्षण तसेच स्त्रियावरील अत्याचार या विषयावर पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. ही पोस्टर प्रदर्शनी विद्यार्थ्यांनी स्वत: चित्रे व लेखन करून तयार केली.

जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम समाजकार्य विभागात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर पुसदकर, प्रा. रश्मी पडुके, प्रा. धनश्री वाघ, प्रा. खेमलता नानवटकर, सुश्री अनुसया यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्र संचालन कोमल तायडे यांनी केले तर आभार कोमल वाघाडे यांनी केले. या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी विचार व मनोगत व्यक्त केले.

**सावित्रीबाई फुले जयंती: 3-4 जाने. 2022**




दिनांक ३ जानेवारी २०२१ ला सकाळी ११.०० वाजता समाजकार्य विभागाच्यावतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्य “संवाद मनाशी” कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सावित्रीबाई फुलेंचे सामाजिक व शिक्षणविषयक कार्य विद्यार्थ्यांना कळावे हा उद्देश ठेवून या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून समाजकार्य विभागप्रमुख डॉ. प्रभाकर पुसदकर हे उपस्थित होते. यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयीची माहिती विद्यार्थ्यांना कथेच्या माध्यमातून दिली. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते

**सावित्रीबाई फुले जयंती: मोडू या! प्रथा कन्यादानाची : ४ जानेवारी २०२२**




दिनांक ४ जानेवारी २०२२ ला सकाळी ११.00 वाजता मा. सारिका डेहनकर, महारष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या राज्य महिला सहकार्यावाहक मा. सारिका डेहनकर यांनी सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्याने समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी मोडूया प्रथा कन्यादानाची यांचे व्याख्यांपर कार्यक्रम घेण्यात आला. आज आधुनिक काळात पारंपारिकतेनुसार चालत आलेली कन्यादानाची प्रथा कशी वाईट आहे. याविषयीची माहिती PPT व मार्गदर्शनाच्या स्वरुपात त्याचप्रमाणे संवादाच्या स्वरुपात विध्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे मा. निखील जवादे समाजकार्य विभागाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी होते.

# भारतीय संविधान - एक संवाद : १४ डिसेंबर



दिनांक १४ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता कोल्हापूर येथील राजवैभव शोभा रामचंद्र यांनी समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना भारतीय संविधानावर संवादाच्या स्वरुपात मार्गदर्शन केले. भारताचे संविधान केवळ एका समाजाचे नसून ते सर्व समाजाचे आहे. त्याचप्रमाणे भारताच्या संविधानात वेगवेगळ्या संताचे विचार कसे समाविष्ट आहे. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता म्हणजे नेमके काय याविशायेची सविस्तर माहिती संवादाच्या स्वरुपात विद्यार्थांना सांगितली. या कार्यक्रमाला समाजकार्याचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : १४ एप्रिल २०२२




दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ८.०० वाजता महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्य कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष ससनकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्याने त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना  डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला व त्यांचे विचार आजच्या नवीन पिढीसाठी किती उपयुक्त आहे. याविषयी सांगितले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# जागतिक विज्ञान दिवस : २८ फेब्रुवारी २०२२







दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ ला सकाळी ११.०० वाजता समाजकार्य विभागाच्या वतीने जागतिक विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये एकात्मिक दृष्टीकोन ( Integrated approch in science and technology for sustainable future) या दृष्टिकोनावर आधारित हा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून समाजकार्य विभागाचे विभागप्रमुख मा डॉ. प्रभाकर पुसदकर उपस्थित होते. वर्तमान स्थितीत असलेली खनिज संपत्ती व योग्य पर्यावरण हे चिरकाळ कसे टिकवून ठेवता येईल कि, ज्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना प्रत्यक्ष्यात उतरवता येईल. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागाचे सर्व प्राध्यापक व 34 विद्यार्थी उपस्थित होते.